## निशाण क्र. ५५ वरील आदेश

वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली ६ नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व नि.क्र. ६२ ला असलेले म्हणणे वाचले. वादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद सादर केला. पुरेशी संधी देवून देखील प्रतिवादींनी युक्तीवाद सादर केला नाही.

३. प्रतिवादी क्रमांक ५ यांनी दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र नियोजित प्रतिवादी क्रमांक ९ व १० यांना विक्री केले आहे असे दिसून येते. त्या अनुषंगाने वादी यांना नियोजित प्रतिवादी क्रमांक ९ व १० यांना दाव्यात पक्षकार करायचे आहे, तसेच त्याबाबत कथन करायचे आहे असे दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा आहे. त्यामुळे दावा मिळकती संदर्भात झालेल्या व्यवहाराच्या अनुषंगाने सदर दुरुस्तीस परवानगी देणे आवश्यक व गरजेचे वाटते. दाव्यातील वाद मुद्दयांचे गुणावगुणावर अंतिम निवारण होण्यासाठी देखील ही दुरुस्ती महत्त्वाची व आवश्यक वाटते. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही किंवा प्रतिवादींचे नुकसान होईल असे वाटत नाही. अदयाप मुद्दे निघाले नाहीत अगर पुरावा सुरु झाला नाही. त्यामुळे ही दुरुस्ती मंजूर होण्यास कोणतीच अडचण वाटत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : कोरेगाव ( गि. सु. माने )
दिनांक : २२/११/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.